# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०९/०४/२०२४ (मंगळवार) सकाळ**


---

## खुनाचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीतांना अटक

**पोस्टे काटोल:–** अंतर्गत फिर्यादीचे राहते घरी बसस्टॉप जवळ काटोल येथे दिनांक ०७/०४/२०२४ चे १९.३० वा. ते १९.४५ वा. दरम्यान फिर्यादी नामे– रूपनाथ नामदेव ढोके, वय 61 वर्ष रा. वार्ड नं. 2 बस स्टॉप जवळ, काटोल यांचा मुलगा अमित ढोके हा ए. टी. एम. मधुन पैसे काढणे करीता आपले दुकानासमोरील ॲक्टीव्हा गाडी काढत असता आरोपी क्र. 1. सैफ अक्रम अली 2. फत्ते अक्रम अली 3. सुखबिरसिंग गिल सर्व रा.काटोल 4. शैलेद्र सुरेशसिंग बैस रा. पर्वत सावळी ता. काटोल जि. नागपुर 5. हैदर अली रा. पर्वत सावळी ता. काटोल जि.नागपुर 6. दोन ईरानी महीला रा. काटोल सर्व आरोपी हे आपले हातात लोखंडी रॉड घेवुन आले व फिर्यादीचे दुकानात व घरात घुसुन फिर्यादीस व फिर्यादीचे दोन्ही मुलास जिवाने मारण्याचे उद्देशाने रॉड मारले व शिवीगाळ करून जिवाने मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रीपोर्ट वरून पोस्टे काटोल येथे आरोपीतांविरूद्ध कलम कलम 307, 392, 452, 143, 147, 149, 504, 506 भादवि. अन्वये गुन्हा नोंद केला असुन आरोपीतांना अटक केली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि. नागवे सा. हे करीत आहेत.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर